43 Years of Dedication

GSP INDIA

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी

# उडान शिष्यवृत्ती

उडान ही दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी खास तयार केलेली एक अनोखी शिष्यवृत्ती योजना आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी देण्यासाठी या शिष्यवृत्तीत, महाराष्ट्रातील निवडक विद्यार्थ्यांना बारावीनंतरच्या शिक्षणासाठी सहाय्य मिळणार आहे. ही शिष्यवृत्ती योजना गेली 43 वर्षे दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत असलेल्या **ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान (GSP INDIA)** या सामाजिक संस्थेमार्फत अमलात आणली जात आहे. उच्च-शिक्षणासाठी प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, **COEP तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे येथे आम्ही समावेश (Action For Impact) या फाऊंडेशन, पुणे** यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या कॅम्पमध्ये पात्र विद्यार्थ्यांचे ऑनलाईन अर्ज भरण्यात येत आहेत. तरी पात्र विद्यार्थ्यांनी **10 ते 12 सप्टेंबर 2025** या कालावधीत **सायंकाळी 3 ते 5** या वेळेत महाविद्यालयातील **स्कॉलरशिप सेक्शन** येथे उपस्थित रहावे.

## पात्रता निकष

**दिव्यांगत्व**

- दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम (RPWD) 2016 अंतर्गत नमूद केलेल्या कोणत्याही प्रकारच्या दिव्यांगत्वांपैकी एक
- 40% किंवा त्याहून अधिक दिव्यांगत्व असलेले विद्यार्थी
- भारत सरकारकडुन जारी केलेले वैध दिव्यांगत्व प्रमाणपत्र आवश्यक आहे. / विद्यार्थ्यांकिडे
- वैध यूडीआयडी (Unique Disability ID) कार्ड असणे बंधनकारक आहे.

**शैक्षणिक**

- बारावीमध्ये 50% किंवा त्याहून अधिक गुण प्राप्त असावेत.

कोर्स

- विद्यार्थी हा शासनमान्य प्रतिष्ठित महाविद्यालयात व्यावसायिक शिक्षण घेत असावा

*(जसे की B.Com, B.Pharm, MBBS, BHMS, BAMS, B.Sc, Agri, BBA, Engineering, LLB, Social Work, BCA, Nursing, etc. )*

**उत्पन्न**

- वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ₹2.5 लाख किंवा त्यापेक्षा कमी असावे (उपविभागीय
- अधिकारी/तहसीलदार यांचे उत्पन्न प्रमाणपत्र आवश्यक).
- अर्जदाराचे पालक शासकीय नोकरीत नसावे.
- वयोमर्यादा: 16 to 25 वर्ष
- विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

**आवश्यक कागदपत्रे**

- आधार कार्ड
- दिव्यांगत्व प्रमाणपत्र / यूडीआयडी प्रमाणपत्र
- उत्पन्न प्रमाणपत्र (तहसीलदार कार्यालयातून)
- शैक्षणिक गुणपत्रिका (10वी व 12वी)
- कॉलेज प्रवेश फी ची पावती किंवा बोनाफाईड प्रमाणपत्र